| | |
|---|---|
| MHSN080000452017 | दाखल तारीख – ०९.०१.२०१७<br>नोंदणी तारीख – ०९.०१.२०१७<br>निकाल तारीख – ०७.०३.२०२६<br>कालावधी – वर्षे – महिने – दिवस<br>०९ ०१ २८ |

**जत येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालय, जत**
**(पिठासीन अधिकारी प्रकाश चु. बछले)**

**नियमित फौजदारी खटला क्र.१२/२०१७**
**निशाणी क्र.**

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>उमदी पोलीस ठाणे. |
| अभियोग पक्षातर्फे | | श्री. ए. व्ही. विरकर<br>सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| | | |
| आरोपी | | **अजित रावसाहेब शिवशरण,**<br>वय–२२ वर्षे, व्यवसाय – शेती/शिक्षण,<br>रा. भिमनगर, रामपूर, ता. जत, जि. सांगली. |
| आरोपीतर्फे वकील | | श्री. एस. जी. माळी. |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | – | ०९.१०.२०१६ |
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | – | १४५/२०१६ |
| फिर्याद दाखल दिनांक | – | ०९.१०.२०१६ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | – | ०९.०१.२०१७ |
| दोषारोप ठेवलेचा दिनांक | – | ०७.०१.२०२६ |

| | | |
|---|---|---|
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | – | २०.०२.२०२६ |
| युक्तिवाद दिनांक | – | ०७.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | – | ०७.०३.२०२६ |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | – | –––– |

## आरोपीची माहिती

| अ. क्र. | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपातील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा | फौ.प्र. सं.कलम ४२८ नुसार आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अजित रावसाहेब शिवशरण | २३.१०. २०१६ | २४.१०. २०१६ | भा.दं.वि. कलम ३२४, ५०६ अन्वये. | निर्दोष मुक्तता | ––– | ––– |

## भाग क

## अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**अ. अभियोगपक्ष :**

| अ नं. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १ | बापु सुभाष केंगार | फिर्यादी |

**ब. बचावपक्षाचे साक्षीदार, असेल तर**

| अ नं. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- | — | — |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असेल तर**

| अ नं. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| — | — | — |

**<u>अभियोगपक्ष/ बचावपक्ष/न्यायालयीन निशाणी क्रमांकाची यादी</u>**

**अ. अभियोगपक्ष**

| **अ नं.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | — | — |

**ब. बचाव**

| **अ नं.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| --- | -- | -- |

**क.न्यायालयीन निशाणी**

| **अ नं.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | १९ | घटनास्थळ कम मुद्देमाल जप्ती पंचनामा |
| २. | २० | जखमी बापू यांचे वैदयकीय प्रमाणपत्र |

**ड. भौतिक वस्तु**

| **अ नं.** | **वस्तु क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| --- | -- | -- |

## <u>न्या य नि र्ण य</u>
## (घोषित दिनांक ०७.०३.२०२६)

आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिता १८६० (येथून पुढे संक्षिप्तपणे भा.द.वि. असे संबोधण्यात येईल) चे कलम ३२४, ५०६ अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप आहे.

**<u>अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात पुढीलप्रमाणे</u> –**

२. फिर्यादी बापु सुभाष केंगार हे मौजे रामपूर येथे त्यांचे कुटुंबासमवेत राहणेस

होते. दिनांक ०९.१०.२०१६ रोजी रात्री ९.३० चे सुमारास फिर्यादी हे दुकानात गेले होते. तेथून बाजार घेवून घरी येत असताना त्यांचे घरासमोर आरोपी अजित उभा होता. त्यावेळी आरोपीने फिर्यादी यांचेकडे असलेल्या मोबाईलमधील व्हीडीओची मागणी केली. फिर्यादीने त्यास नकार दिला. त्यामुळे, आरोपी फिर्यादी यांच्या अंगावर धावून आला. आरोपीने फिर्यादीच्या डोक्यात दगडाने मारहाण केली. त्यामुळे, फिर्यादीच्या डोक्यातून रक्त येवू लागले. त्यामुळे, फिर्यादी यांना त्यांचे वडील व चुलत भाउ यांनी जत येथील दवाखान्यात दाखल केले. तेथे औषधोपचार घेतल्यानंतर फिर्यादी यांनी जत पोलीस ठाणेत तक्रार दिली. म्हणून आरोपी विरुध्द भा.द.वि.कलम ३२४, ५०६ अन्वये शिक्षापात्र गुन्हा नोंद करणेत आला.

**३.** सदर गुन्ह्याचा तपास श्री. एस.बी. शिरसाट, पो.हे.कॉ.ब.क्र.११५७, जत पोलीस ठाणे यांनी केला. त्यांनी आरोपींना अटक केली. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. गुन्हयामध्ये वापरणेत आलेला मुद्देमाल जप्त केला. घटनास्थळ व मुद्देमाल जप्तीचा पंचनामा केला. जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. चौकशीअंती आरोपींनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. निशाणी क्र.१२ कडे भा.द.वि.कलम ३२४,५०६ नुसार आरोपी विरुध्द दोषारोप ठेवण्यात आला. आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे सांगून खटला पुढे चालविण्याची संमत्ती दर्शविली. गुन्हयामध्ये गोवविण्याइतपत पुरावा न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**४.** प्रस्तुत प्रकरणातील सारांश तसेच अभिलेखावर दाखल पुरावा व कागदपत्रे तसेच दोन्ही वकीलांचा युक्तीवाद यांचा विचार करता खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दयावरील निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे दिले आहेत–

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | दिनांक ०९.१०.२०१६ रोजी रात्री ९.४५ चे सुमारास भिमनगर, रामपूर येथे आरोपीने फिर्यादी यांच्या डोक्यात दगडाने मारहाण करून गंभीर दुखापत पोहोचवली आणि | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | त्यायोगे भा.द.वि. कलम **३२४** अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | |
| २. | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस दमदाटी करून भा.द.वि.सं. कलम **५०६** अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नाही. |
| ३. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**५.** अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द गुन्हा शाबीत करण्याच्या दृष्टीने फिर्यादी बापू या एकमेव साक्षीदारास तपासलेले आहे. तसेच घटनास्थळ व जप्ती पंचनामा व जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र आरोपीतर्फे मान्य केले असल्यामुळे त्यांना अनुक्रमे नि.१९ व २० देणेत आली.

**विचाराधीन बाबी क्र.१ व २ बाबत**:–

**६**. वरील दोन्ही विचाराधीन बाबी या एकमेकांशी निगडीत असल्याने व समान पुराव्यावरच अवलंबून असल्याने उपलब्ध असलेल्या पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी वरील विचाराधीन बाबींचे विवेचन एकत्रीत केलेले आहे.

**७**. आरोपींविरुध्द गुन्हा शाबीतीकरिता अभियोग पक्षाने केवळ एक साक्षीदार तपासलेला आहे. फिर्यादी यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान असे कथन केले आहे की, घटना केंव्हा घडली होती हे त्यांना आठवत नाही. पाय घसरल्यामुळे अंधार असल्याने ते खाली पडले. पुढे काय घडले हे त्यांना माहीत नाही. फिर्याद नि.१७ व पहिली खबर नि.१८ वर त्यांच्या सहया आहेत. तथापी, त्यातील मजकूर त्यांना माहीत नाही. अशाप्रकारे फिर्यादीला घटनेबाबत सांगता आलेले नाही. त्यामुळे, सदर साक्षीदाराला अभियोग पक्षातर्फे फितूर घोषीत करुन त्यांचा विस्तृत उलटतपास घेतला. परंतु, अभियोग पक्षास मदत होईल असा कोणताही सबळ पुरावा उलटतपासातून अभिलेखावर आलेला नाही.

याउलट, आरोपी व त्यांच्यामधील वाद मिटला असल्याचे त्यांनी मान्य केलेले आहे. त्यानुसार फिर्यादी व आरोपी यांची संयुक्त तडजोड पुरशिस नि.१५ कडे दाखल आहे. एकंदरीत ज्या व्यक्तीला मारहाण झाल्यामुळे दुखापत झालेली आहे ती व्यक्तीच जर आरोपी विरुध्द तक्रार करत नसेल तर, फिर्यादी यांची फिर्याद भारतीय पुरावा कायदयाप्रमाणे शाबीत होवू शकणार नाही.

८. फिर्यादीचा तोंडी पुरावा पाहता असे दिसते की, त्यांनी अभियोग पक्षास सबळ पुरावा अभिलेखावर आणणेकरिता कोणत्याही प्रकारे सहाय्य केलेले नाही. तसेच फिर्याद ही भारतीय पुरावा कायदयान्वये सिध्द झालेली नाही. जरी आरोपीने घटनास्थळ–जप्ती पंचनामा व जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र मान्य केले असले तरी, तथाकथित घटनेची व फिर्यादीला झालेल्या दुखापतींची जबाबदारी आरोपीवर टाकता येवू शकत नाही. वर चर्चिल्याप्रमाणे वैदयकीय प्रमाणपत्रामध्ये नमूद करणेत आलेल्या जखमा या आरोपीने फिर्यादी यांना मारहाण केल्यामुळेच झाल्या ही बाब शाबीत झालेली नाही.

९. एकंदरीत वरील सर्व विवेचनावरुन असे दिसते की, आरोपीवर भा.द.वि.कलम ३२४,५०६ अन्वये ठेवण्यात आलेले दोषारोप हे अभियोग पक्ष यांना संशयापलीकडे शाबीत करण्यास अपयश आलेले आहे तसेच आरोपी विरुध्द कोणताही प्रत्यक्षदर्शी किंवा परिस्थितीजन्य पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सदरची बाब विचारात घेता, आरोपी पुरेशा पुराव्या अभावी निर्दोष मुक्ततेस पात्र ठरतो. म्हणून, मी विचाराधीन बाब क्र.१ व २ ची उत्तरे नकारार्थी नोंदवून विचाराधीन बाब क्र.३ करिता खालीप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | आरोपी **अजित रावसाहेब शिवशरण** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये, भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३२४,५०६ या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करणेत येत आहे. |
| २. | जप्त मुद्देमाल दगड मुल्यहिन असल्याने तो आव्हान कालावधीनंतर फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५२ नुसार नाश करणेत यावा. |

| | |
|---|---|
| ३. | आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येतो |
| ४. | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ चे पूर्ततेसाठी रक्कम रुपये १५,०००/– चे बंधपत्र सादर करावे. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयामध्ये पारित करणेत आला.) |

PRAKASH CHUNNI BACHHALE

Digitally signed by PRAKASH CHUNNI BACHHALE
Date: 2026.03.07 16:49:06 +0530

दिनांक –०७.०३.२०२६
जत.

**(प्रकाश चु. बछले)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, जत.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | R. B. Samalewale |
| Name of the Court | :- | Shri. Prakash C. Bachhale, Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Jath. |
| Date of decision | :- | 07.03.2026 |
| Order signed by P.O. on | :- | 07.03.2026 |
| Order uploaded on | :- | 07.03.2026 |